**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई**

**कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) राज्यस्तरीय पदभरती जाहिरात सन 2015.**

महाराष्ट्र शासनाने मुंबई सा.बां.परिमंडळाला दिलेल्या प्राधिकारानुसार **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)** या संवर्गाची रिक्त पदे विहित शैक्षणिक अर्हता धारण करत असलेल्या पात्र उमेदवारांमधुन भरण्यासाठी सदस्य सचिव तथा कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, मुंबई यांचे मार्फत स्पर्धात्मक परिक्षेसाठी केवळ ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावयाची सुविधा www.pwdje2016.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच सदर जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या www.mahapwd.com संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

❖ **परिक्षेचे वेळापत्रक** :-

| अ.क्र | प्रक्रिया | दिनांक |
|---|---|---|
| 1. | ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याचा कालावधी | दिनांक **09/05/2016** (सकाळी 12.00 पासून) ते दिनांक **24/05/2016** (सायंकाळी 05.30 पर्यंत) |
| 2. | ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरल्यानंतर तयार होणाऱ्या चलनाद्वारे स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेमध्ये परीक्षा शुल्क स्विकृतीचा अंतिम दिनांक | दिनांक **25/05/2016** |
| 3. | ऑनलाईन परिक्षेचे प्रवेशपत्र संकेतस्थळावर उपलब्ध होण्याचा कालावधी | दिनांक **02/06/2016** (सकाळी 12.00 पासून) ते दिनांक **09/06/2016** (सायंकाळी 05.30 पर्यंत) |
| 4. | ऑनलाईन परिक्षेचा दिनांक | दिनांक **19/06/2016** (संभाव्य) |

भरती प्रक्रिया संदर्भातील सर्व कार्यक्रम, कार्यक्रमातील बदल सूचना वगैरे www.pwdje2016.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतील. उमेदवारांशी कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नसून या संकेतस्थळावर संपर्क साधण्याची दक्षता उमेदवारांनी घ्यावयाची आहे.

**पदभरती करीता पदांचा तपशिल खालील प्रमाणे.**

**पदनाम :- कनिष्ठ अभियंता (स्थापत्य ) गट ब (अराजपत्रित )**

**वेतनश्रेणी :- रु.9300-34800 (ग्रेड वेतन रु.4,300/-) उपलब्ध पदसंख्या (एकूण पदे-80 )**

------

| अ.क्र. | सामाजिक आरक्षण | भरावयाची एकुण पदे | समांतर आरक्षणाचा तपशिल | | सर्वसाधारण |
|---|---|---|---|---|---|
| | | | महिला 30 टक्के | खेळाडू 5 टक्के | |
| 1. | 2. | 3. | 4. | 5. | 6. |
| 1. | अनुसुचित जाती | 10 | 03 | 01 | 06 |
| 2. | अनुसुचित जमाती | 08 | 02 | 00 | 06 |
| ३. | भटक्या जाती (ब ) | 01 | 00 | 00 | 01 |
| 4. | भटक्या जाती (क ) | 01 | 00 | 00 | 01 |
| 5. | भटक्या जाती (ड) | 01 | 00 | 00 | 01 |
| 6. | विशेष मागास प्रवर्ग | 01 | 00 | 00 | 01 |
| 7. | इतर मागास वर्ग | 10 | 03 | 01 | 06 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 8. | खुला | 48 | 14 | 02 | 32 |
| | **एकुण** | **80** | **22** | **04** | **54** |

- स्पर्धात्मक परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशत: बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्गनिहाय संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार शासन सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय,मुंबई यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. याबाबत कोणताही दावा करता येणार नाही. तसेच, दर्शविण्यात आलेल्या समांतर आरक्षणाचा पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच राखीव प्रवर्गातील इतर पात्र उमेदवारांचा शासन विहीत नियमानुसार विचार केला जाईल.

- पदभरती प्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारी बाबत अधीक्षक अभियंता, मुंबई (सा.बां.) परिमंडळ, मुंबई यांना शासन सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय, मुंबई यांच्या मान्यतेच्या अधीन राहून अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार राहतील.

  ज्या उमेदवारांनी यापूर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय / समाजकल्याण, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयात नावे नोंदविलेली आहेत अशा उमेदवारांना वरील भरतीच्या पदासाठीच्या लेखी परिक्षेसाठी स्वतंत्ररित्या अर्ज करणे आवश्यक राहिल. तसेच प्रकल्पग्रस्त, अंशकालीन अशा उमेदवारांनी देखील भरतीच्या अधिकृत वेबसाईटवर स्वतंत्रपणे अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांनी अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही अथवा अशा उमेदवारांना या कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.

- उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (online) पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना, शैक्षणिक प्रमाणपत्रे / कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापी ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांच्या पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण अचूक व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहिल्यास व भरतीच्या कोठल्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील. याबाबत उमेदवाराची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती अर्ज सादर केल्यानंतर बदलता येणार नाही. त्यामुळे ऑनलाईन अर्जाची माहिती उमेदवारांनी काळजीपुर्वक / विचारपुर्वक भरावी. जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या सर्व अटी, शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण, वयोमर्यादा शिथिलीकरण वगैरेची पात्रता तपासूनच ऑनलाईन अर्ज भरावा.

- शासन निर्णय क्र.प्रानिमं-1214/प्र.क्र.(43/14)/13-अ दिनांक 05.06.2014 नुसार गट- क मधिल कोणत्याही पदासाठी मुलाखत घेण्यात येणार नसल्याने भरती प्रक्रीयेत पात्र झालेल्या उमेदवारांची लेखी परिक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्याच आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवड केली जाईल व अशा उमेदवारांना शैक्षणिक व इतर संबंधातील मुळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे तपासणी करीता पडताळणी समितीकडे उपलब्ध करून दयावी लागतील अन्यथा अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.

- **<u>पात्रता</u>** :-

  खाली नमूद केलेली शैक्षणिक अर्हता / अनुभव जाहीरातीच्या दिनांकास 09/05/2016 प्रमाणपत्रासहीत पूर्ण धारण करणे आवश्यक आहे

| पदनाम | वय | शैक्षणिक व तांत्रिक अर्हता | इतर अर्हता |
|---|---|---|---|
| 1. | 2. | 3. | 4. |
| कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | 18 वर्षे ते 38 वर्षे | उमेदवाराने शासनमान्य स्थापत्य अभियांत्रिकी पदविका (Diploma in Civil Engineering) स्थापत्य अभियांत्रिकी मधील फक्त पदविकाधारक | 1) उमेदवार D.O.E.A.C.C सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर यापैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडील अधिकृत MS- |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | CIT परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाकडील शासन निर्णय क्र.मातंस 2012/प्र.क्र.277/39, दिनांक 04 फेब्रुवारी 2013 मध्ये नमुद केलेल्या संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण असावा.<br>2) भाषा परिक्षा, शालांत प्रमाणपत्र परिक्षा (एसएससी ) मराठी व हिंदीसह उत्तीर्ण किंवा एतदर्थ मंडळाची परिक्षा नियुक्तीपासून सहा महिन्याच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक. |

❖ **<u>वयोमर्यादेतील सवलत :-</u>**

वयोमर्यादेकरीता उमेदवाराचे दिनांक 09/05/2016 रोजीचे वय विचारात घेतले जाईल.

1. खुल्या प्रवर्गातील उमेदवारा करिता कमाल वयोमर्यादा ३8 वर्ष
2. मागासवर्गीय उमेदवार :- 43 वर्ष
3. अपंग / अपंग माजी सैनिक / प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त / स्वतंत्र सैनिक निर्देशित पाल्य / 1991 चे जनगणना कर्मचारी व 1994 नंतरचे निवडणूक कर्मचारी /शासकीय कर्मचारी - 45 वर्ष.
4. अंशकालीन उमेदवार : 46 वर्षे.
5. माजी सैनिकांसाठी विहीत वयोमर्यादेतील सवलत, सामान्य प्रशासन विभाग, शासन शुद्धीपत्रक क्रमांकः मासैक-1010/प्र.क्र.279/10/16-अ, दिनांक 20 ऑगस्ट, 2010 प्रमाणे राहील.

❖ **<u>शासकीय सेवेमध्ये भरती झाल्यास होणारी उपलब्धी</u> :-**

| पदनाम | वेतनश्रेणी | वेतन अंदाजित (रु) | पदोन्नतीची संधी |
|---|---|---|---|
| कनिष्ठ अभियंता गट ब (अराजपत्रित) | पी.बी.1 9300-34800<br>ग्रेड वेतन 4300/- | मुळ वेतन 10100/- + ग्रेड वेतन 4300 /- = एकुण 14400/- + इतर भत्ते | कार्यकारी अभियंता पर्यंत |

❖ **नेमणुकीच्या सर्वसाधारण अटी :-**

1) उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा (डोमिसाईल प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक ) अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

2) सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

3) विहित वयोमर्यादेतील शासकीय, निमशासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांचे कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने विहित मार्गाने विहित मुदतीत अधिकृत संकेतस्थळावरून ऑनलाईन भरावे व अशा परवानगीची प्रत उमेदवारांकडे असणे आवश्यक आहे व त्याबाबची कागदपत्रे छाननीच्या वेळी सादर करावी.

❖ **<u>परिक्षेचे स्वरूप</u> :-**

| अ.क्र. | पदनाम /संवर्ग | ऑन लाईन परिक्षासाठीचे गुण |
|---|---|---|
| 1. | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट ब (अराजपत्रित) | 100 |

❖ **<u>ऑनलाईन परिक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप व कार्यक्रम :-</u>**

1. ऑनलाईन परिक्षेची प्रश्न पत्रिका वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी स्वरूपाची असेल. सर्व प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.

बहुपर्यायी प्रश्नांसाठी दिलेल्या चार पर्यायांपैकी एकच पर्याय निवडावा. (निगेटिव्ह) नकारात्मक गुणपध्दत (मार्क सिस्टिम) अवलंबली जाणार नाही.

2. कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) / या पदाची ऑनलाईन परिक्षा इंग्रजी, मराठी, चालू घडामोडी, सामान्य ज्ञान, पदांसंबंधीचे तांत्रिक ज्ञान, व बुध्द्‌दीमत्ता चाचणी यावर आधारीत असेल.

❖ **परिक्षा शुल्क :-**

| अ.क्र. | पदनाम /संवर्ग | खुला प्रवर्ग | राखीव प्रवर्ग |
|---|---|---|---|
| | | | |
| 1. | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट ब (अराजपत्रित) | रू.३०० | रू.150 |

1. माजी सैनिकांना परिक्षा शुल्क माफ आहे.
2. उक्त परिक्षा शुल्क स्टेट बँक ऑफ इंडीया बँकेच्या कोणत्याही शाखेत ऑन लाईन अर्जा सोबत प्राप्त झालेल्या चलनाव्दारेच रोखीने भरणे आवश्यक आहे.

   वर दर्शविण्यात आलेले परिक्षा शुल्क हे बँक प्रोसेसिंग चार्जेस वगळून आहे.
3. स्टेट बँक ऑफ इंडीया कडून रू.60/- इतके प्रक्रिया शुल्क आकारले जाईल. सदर शुल्क उमेदवाराने भरावयाचे आहे.

❖ **टिप :- <u>अर्ज करण्याची पध्दत</u> :-**

1. प्रस्तुत पदांकरीता फक्त (www.pwdje2016.in) या अधिकृत संकेतस्थळावरुन विहित पध्दतीने भरलेले ऑनलाईन पध्दतीने केलेलेच अर्ज स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी. व मोबाईल क्रमांक चूकिचा / अपुर्ण तसेच मोबाईल क्रमांक रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपुर्ण भरती प्रक्रिये दरम्यान त्या द्‌वारे पाठविल्या जाणा-या सूचना, संदेश व माहीती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

   तसेच, ई-मेल आयडी. व मोबाईल संदेश वहनात येणा-या तांत्रिक अडचणींना अधीक्षक अभियंता मुंबई सा.बां.परीमंडळ,मुंबई हे जबाबदार असणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहितीबाबत अद्‌ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहिल.
2. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना (www.pwdje2016.in) या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज परिपूर्ण भरल्यानंतर स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेत फी भरण्याचे चलन 3 प्रतीमध्ये (उमेदवाराची प्रत, बँकेची प्रत व सार्वजनिक बांधकाम विभागाची प्रत) उपलब्ध होईल. सदर चलनाची प्रिंट काढून त्या चलनामार्फतच उमेदवाराने चलनात नमूद असलेली आवश्यक ती फी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेमध्ये भरणे आवश्यक राहिल. सदरच्या 3 प्रतीपैकी उमेदवारास त्याची स्वत:ची प्रत व सार्वजनिक बांधकाम विभागाची प्रत उमेदवारास स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेकडून परत मिळेल, त्यापैकी सार्वजनिक बांधकाम विभागाची मूळ प्रत उमेदवारांनी कागदपत्र छाननीचे वेळी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे जमा करावी. चलनाची मूळ प्रत असल्याशिवाय उमेदवाराची कागदपत्रे छाननी घेतली जाणार नाही. बँकेत परिक्षा शुल्क भरण्याचा कालावधी दिनांक 09/05/2016 ते दिनांक 25/05/2016 असा आहे. अंतिम दिनांका नंतर बँकेत परीक्षा शुल्क भरणा-या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही.
3. उमेदवाराने स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेत पैसे भरल्यानंतर उमेदवाराला त्याची स्थिती (www.pwdje2016.in ) या संकेतस्थळावर पुढच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी पाहता येऊ शकेल.
4. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना उमेदवाराजवळ स्वत:चा वापरातील ई-मेल आयडी आवश्यक आहे. पुढील सर्व पत्रव्यवहार उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेल्या ई-मेल आयडी द्‌वारे होणार असल्याने अचूक ई-मेल आयडी नोंदविणे आवश्यक आहे व याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार असल्यास ती विचारात घेतली

जाणार नाही. तसेच स्वत:चा अद्ययावत (Latest) विहित नमुन्यातील पासपोर्ट साईझ फोटो व सही स्कॅन करुन (www.pwdje2016.in ) या संकेतस्थळावरील सूचनेनुसार विहित पध्दतीने अपलोड करणे अनिवार्य आहे.

5. ऑनलाईन अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारखेनंतर संकेतस्थळावरील लिंक बंद केली जाईल.

6. उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरण्यासंबंधी अडचणी असल्यास भ्रमनध्वनी क्रमांक 9172591712, 9172591762, कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

**सर्वसाधारण सुचना :- (कार्यपद्धती, अटी व शर्ती)**

1. ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरुन विहित परिक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची स्थिती, परिक्षेची रुपरेषा / वेळापत्रक / परिक्षाकेंद्र / बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती वर दिलेल्या (वेबसाईट) वर उपलब्ध राहील. या संबंधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. सबब सदर संकेतस्थळाला भरतीप्रकीये दरम्यान वेळोवेळ भेट देवून भरती प्रक्रीयेची माहिती / कार्यक्रमाबाबत अद्ययावत राहण्याची, प्रवेशपत्रे डाऊनलोड करून घेणेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

2. ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे ऑनलाईन परिक्षेस बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही.

3. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर (निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी) अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास, ऑनलाईन अर्जात दिलेली माहिती / अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास शासनाची दिशाभूल केल्यामुळे त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल तसेच, एखाद्या अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबाव आणल्यास अथवा गैरप्रकाराचा अवंलब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून वगळण्यात येईल व नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येवून त्याच्या विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

4. उमेदवारास ऑनलाईन परिक्षा व कागदपत्रे तपासणी इत्यादी करिता स्वखर्चाने यावे लागेल.

5. उमेदवारांनी यापूर्वी जरी त्याचे नांव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे (सेवायोजन कार्यालयाकडे) नोंदविले असले तरी त्यांनी या पदांच्या अधिकृत संकेतस्थळावर स्वतंत्रपणे विहित शुल्कासहित ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक आहे.

6. संकेत स्थळावरुन उत्तरतालिका परिक्षा झालेल्या दिवसापासून 5 दिवसात प्रसिध्द केली जाईल. जेणेकरुन उमेदवारास स्वत:चे गुण काढता येतील.

7. ऑनलाईन परिक्षेचे ठिकाण, वेळ, दिनांक उक्त संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येतील. परिक्षेचे प्रवेश पत्र उक्त संकेतस्थळावरुन स्वत: डाऊनलोड करुन घेण्याची जबाबदारी सर्वस्वी उमेदवाराची असेल. प्रवेशपत्र इतर कोणत्याही पध्दतीने उमेदवारास पाठविले जाणार नाही.

8. उमेदवाराची ऑनलाईन परीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी / छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. ऑनलाईन परिक्षेच्या प्राथमिक गुणवत्तेच्या आधारे, उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार अंतरिम यादी प्रसिध्द करुन उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून वगळण्यात येईल. पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार निवड समितीकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

❖ **<u>अंतिम निवड</u>** :-

पात्र उमेदवारांचा अंतरिम तसेच अंतिम निकाल वरील संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल.

अ) उमेदवाराची अंतिम निवड ही ऑनलाईन परिक्षेत मिळालेल्या एकूण गुणांच्या आधारे केली जाईल.

ब) एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण मिळाल्यास महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय प्रानिमं/१२१५/(प्रक्र.५५)१५) १३-अ मंत्रालय, मुंबई दि. ५ ऑक्टोंबर २०१५ च्या शासन निर्णयाप्रमाणे निवडयादी केली जाईल.

❖ **<u>विशेष सूचना</u>** :-

1. कनिष्ठ अभियंता (स्थापत्य ) या संवर्गातील अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्रातील मुंबई / पुणे / नागपूर इत्यादी कोणत्याही परिमंडळात नियुक्ती देण्यात येईल.

2. कनिष्ठ अभियंता (स्थापत्य ) या संवर्गातील अभियंत्यांच्या बदल्या महाराष्ट्रात कोठेही करण्यात येईल.

3. महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1981 (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसुचना, शासन निर्णय, परिपत्रके व शुध्दीपत्रकांमधील तरतुदी उमेदवारांस बंधनकारक राहतील.

4. शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदली करीता महाराष्ट्र बदली अधिनियम-2005 मध्ये नमुद करण्यात आलेल्या तरतुदींच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येईल. विनियम व शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम 2005 तसेच सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एसआरव्ही-2010/प्र.क्र.2010/10/12 दिनांक 03/06/2011 मधील निर्देशानुसार अन्यत्र बदलीच्या तरतूदी लागू राहतील.

5. शासन वित्त विभाग निर्णय क्र.अनियो/10/05/126/सेवा-4 दिनांक 31.10.2005 नुसार दिनांक 01.11.2005 रोजी व त्यानंतर निवड होणाऱ्या उमेदवाराचा नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील. त्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना (म्हणजे म.ना.से.(निवृत्तीवेतन) नियम 1982 व म.ना.से.(निवृत्ती वेतनाचे अंशराशिकरण) नियम 1984) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

6. शासन सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र.एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12 दिनांक 28.03.2005 व शासन परिपत्रक एसआरव्ही-2000/ प्र.क्र.17 / 2000 / 12 दिनांक 01.07.2005 मध्ये विहित केल्यानुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 अन्वये शासनाने गट अ,ब,क व ड मधील सेवा प्रवेशासाठी प्रतिज्ञापत्र नमुना (अ) आवश्यक अर्हता म्हणून विहित नमुन्यातील लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र आवश्यक आहे.

7. शासकीय सेवेमध्ये नियुक्त झाल्यानंतर संबंधित उमेदवारांने सहा महिन्याच्या आत वैद्यकीय दृष्टया सक्षम असल्याचे जिल्हा शासकीय रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्याकडून शासकीय सेवेत काम करण्यास पात्र असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र नियुक्ती झालेल्या कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे.

8. शासकीय सेवेमध्ये नियुक्त झाल्यानंतर संबंधित उमेदवारांची नेमणुक त्याचे पुर्वचरित्र व वर्तवणूक (पोलीस एन्कॉएरी) यांच्या समाधानकारक तपासणी अहवालावर अवलंबून राहील व तसा अहवाल आक्षेपार्ह असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांना सेवेतुन काढून टाकण्यात येईल.

9. मागासवर्गीय आरक्षण :- वि.जा.अ, भ.ज.ब., भ.ज.क., भ.ज.ड., इ.मा.व. या मधील उमेदवारांनी ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे दिनांक 31/03/2016 नंतरचे प्रमाणपत्र (Non Crimilayer Certificate) सादर करणे आवश्यक आहे.

ज्या उमेदवारांची निवड विशिष्ट मागासप्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झालेली आहे, अशा उमेदवारांस त्यांच्या जात प्रमाणपत्र वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल. नियुक्ती आदेश

प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आतमध्ये आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करून घेणे आवश्यक राहील.

10. महिलांसाठी आरक्षण :- आरक्षणाची मागणी ऑनलाईन अर्जात करणे आवश्यक आहे. उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे दिनांक 31/03/2016 नंतरचे प्रमाणपत्र (Non Crimilayer Certificate) कागदपत्रे छाननीच्या वेळी सादर करावे.

11. खेळांडूसाठी आरक्षण :- फक्त अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी उच्च वयोमर्यादा 5 वर्षापर्यंत शिथिल केली आहे. क्रिडा व युवक सेवा महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील प्रमाणपत्र निवडीनंतर नियुक्तीचे आदेश देण्यात येतील.

12. भूकंपग्रस्त व प्रकल्पग्रस्तांसाठी आरक्षण :- हे आरक्षण कनिष्ठ अभियंता गट ब (अराजपत्रित ) यांना लागू नाही.

13. शासकीय व निमशासकीय कर्मचारी :- त्यांनी त्यांचे अर्ज कार्यालय प्रमुखाच्या परवानगीने विहित मार्गाने विहित मुदतीत भरावे. परवानगीची प्रत, कागदपत्रे छाननीच्यावेळी सादर करावी.

14. अंशकालीन उमेदवार :- सुशिक्षित बेरोजगार अर्थसहाय्य योजनेंतर्गत तीन वर्षे दरमहा मानधनावर अंशकालीन काम केलेल्या पदवीधर /पदवीधारक उमेदवारांनी सदरच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी असणे आवश्यक असून तशी नोंद ऑनलाईन अर्जात करावी. सदर प्रमाणपत्र व नोंदणीचे प्रमाणपत्र कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करावे.

15. माजी सैनिकांसाठी आरक्षण :- सशस्त्र दलात किमान 6 महिने सेवा केलेल्या माजी सैनिक / राजाधिष्ठ अधिकाऱ्यांना सैन्यातील कालावधी अधिक तीन वर्षे इतकी कमाल वयाची सवलत नियुक्तीसाठी देण्यात येईल म्हणजेच त्यांच्या वयातून सैनिकी सेवेचा कालावधी कमी केल्यावर परिणामभूत वय हे विहित वयोमर्यादेपेक्षा तीन वर्षाहून अधिक असावे.

16. पदभरतीच्या अधिसुचना, शासन निर्णय व परिपत्रके आवश्यकतेनुसार महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळवरून उमेदवाराने स्वत: उपलब्ध करून घ्यावीत.

जा.क्र.काअ/एघ/आस्था-२/भरती/1755
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग,
2 रा मजला,बांधकाम भवन
25, मर्झबान रोड,फोर्ट,
मुंबई - 400 001.
दुरध्वनी क्र.022-22016974/76
दिनांक - 03/05/2016

**सदस्य सचिव**
तथा
**कार्यकारी अभियंता,**
एकात्मिकृत घटक (सा.बां.)
विभाग,
मुंबई-400 001.

प्रत :- उप सचिव (आस्था) सा.बां.विभाग, मंत्रालय मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत :- मा.मुख्य अभियंता मुंबई (सा.बां.) प्रादेशिक विभाग,मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत :- अधीक्षक अभियंता मुंबई (सा.बां.) मंडळ मुंबई व समन्वय अधीक्षक अभियंता मुंबई (सा.बां.) परिमंडळ मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.